# रात्रीभोजन - अन्य दर्शनीच्या मताने

श्री जिनशासन एवढी सुक्ष्मता, अन्य दर्शनी मध्ये नसते, परंतु ते रात्रीच्या जेवणामध्ये असंख्य जीवांच्या हिंसेचा स्वीकार करतात व त्याला ते महापाप म्हणतात. अर्थात रात्रीभोजणाला ते नरकाचा नेशनल हाइवे नंबर एक म्हणतात. रात्रीजेवण करणारांचे तीर्थयात्रा जप-तप, तीर्थयात्रा यांसारखे सत्कार्य (पुण्य) निष्फळ होतात असे ते स्पष्ट सांगतात.

आज कदाचीत धर्मगुरु त्यांना शास्त्राच्या सत्य गोष्टी सांगत नसतील, त्यांना अंधारात ठेवत असतील, पण एवढ्यानेमात्र रात्रीजेवणाचे पाप नष्ट होत नाही !!

आस्तीक दर्शन आणि योग दर्शन मध्ये सुध्दा रात्री भोजनाला पाप मानले आहे आणि त्याला अभक्ष सांगीतले आहे. आणि त्यांच्या त्यागाची प्रेरणा दिली आहे. त्यांनी रात्रभोजन त्यागाचे फळ म्हणजे एका महीन्यामध्ये पंधरा उपवासाचे (फराळाविना) पुण्य लाभल्यासारखे आहे असे सांगीतले आहे. आणि एकावेळेच्या रात्रभोजनाच्या पापाची शुध्दी सहस्त्र चांद्रायण तपाने देखील होत नाहि असे सांगीतले आहे.

रात्रीभोजन त्यागाबद्धल ग्रंथाधार :

चत्वारो नरकद्वारा, प्रथमं रात्रिभोजनम् ।

परस्त्रीगमनं चैव, सन्धानानन्तकायिके ।।     पद्मपुराण-प्रभासखंड.

नरकाचे चार दरवाजे आहेत, त्यात १. रात्रभोजन २. परस्त्रीगमन ३. लोणचे आणि ४. अनंतकाय (कंदमुळे) भक्षण.

**अर्थात जे या पापां पासुन निवृत्त होत नाहि त्यांची नरका मध्ये जाण्याची संभवना अत्यंत अधिक आहे. त्यांना नरका मध्ये अनंत दु:ख भोगायला लागतात. त्यांचा नरकामधील आयुष्याचा कालावधी जघन्य (कमीत कमी-Minimum) १०००० वर्ष आहे आणि उत्कृष्ट (जास्तीत जास्त-Maximum) ३३ सागरोपम (असंख्य काल) आहे. नरका मध्ये प्रत्येक समयवेळ (काळाचा सर्वात छोटा अंश) अनंत दु:ख आहे. ज्याचे वर्णन करणे सुद्धा असंभव आहे.**

मद्यमांसाशनं रात्रौ - भोजनं कंदभक्षणम् ।
ये कुर्वन्ति वृथास्तेषां, तीर्थयात्रा जपस्तप: ।। महाभारत (ऋषीश्वरभारत)

**जे लोक दारु, मांसाहार-मांस, रात्रभोजण आणि कंदमुळ यांचे भक्षण करतात त्यांचे जपतप, तीर्थ यात्रा, अनुष्ठान निष्फळ जातात.**

**अर्थात रामायणाप्रमाणे महाभारतामध्ये सुध्दा दारु, मांसाहार, रात्रभोजण, आणि कंदमुळाचा त्याग करा असा उपदेश दिला आहे.**

अस्तंगते दिवानाथे, आपो रूधिरमुच्यते ।
अन्नं मांससमं प्रोक्तं, मार्कण्डेयमहर्षिणा ।।     मार्कण्डेयपुराण

**सुर्यास्ता नंतर पाणी पीणे हे रक्त पिण्या सारखे आणि जेवण करणे हे मांस खाण्यासारखे आहे, असे मार्कण्डेय ऋषि सांगतात.**

मृते स्वजनमात्रेऽपि, सूतंक जायते किल ।
अस्तंगते दिवानाथे, भोजनं किमु क्रियते ? ।।

**स्वजन स्नेही मरण पावता माणसाला सुतक लागते, तर मग सुर्यास्ता नंतर जेवण कसे काय करु शकतो ?**

**अर्थात स्वजनांचा मृत्यु झाल्यानंतर जो पर्यंत प्रेत घरामध्ये असते तो पर्यंत घरातील कोणीही भोजन करत नाही, मग सुर्यास्त झाल्यानंतर भोजन कसे करु शकतात ? अर्थात रात्रीभोजन कसे करु शकतात ?**

मद्यमांसाशनं रात्रौ-भोजनं कंदभक्षणम् ।
भक्षणात् नरकं याति, वर्जनात् स्वर्गमांप्नुयात् ।।

**जो मदिरा, मांस, रात्रिजेवण आणि कंदमुळ यांचे भक्षण करतो तो नरकामध्ये जातो आणि या सर्वांचा त्याग करणारा स्वर्गामध्ये जातो.**

ये रात्रौ सर्वदाऽऽहारं, वर्जयन्ति सुमेधसः ।
तेषां पक्षोपवासस्य, फलं मासेन जायते ।।

**जे पुण्यात्मा रात्रिच्या सर्वच आहाराचा (पाण्यासहित) त्याग करतात त्यांना एक महिन्यामध्ये पंधरा (१५ दिवसांचे) उपवासांचे फळ लाभते.**

**अर्थात रामायण, महाभारताप्रमाणे मार्कंण्डेयपुराणामध्ये सुध्दा मदिरा, मांस, रात्रभोजन आणि कंदमुळाच्या त्यागाचा उपदेश दिला आहे आणि त्या त्यागाचे फळ म्हणजे एका महिन्यामध्ये पंधरा उपवास केल्याप्रमाणे आहे आणि त्यामुळे स्वर्गप्राप्ती देखील सांगीतली आहे.**

नोदकमपि पातव्यं रात्रावत्र युधिष्ठिर ।
तपस्विना विशेषेण, गृहिणा च विवेकिना ।। मार्कंड पुराण अ.३0श्लोक २२.

**युधिष्ठिर! खास करुन तपस्वीनी आणि विवेकी गृहस्थानी रात्री पाणि पीऊ नये.**

**अर्थात रात्रीभोजनाच्या त्यागाबरोबर सर्व लोकांना आणि खास करुन तपस्वीयांना सुर्यास्तानंतर पाणी पिण्याचा पण त्याग करणे आवश्यक आहे.**

त्वया सवमिदं व्याहतं, ध्येयोडसि जगतां रवे !
त्वयि चास्तमिते देव ! आपो रुधिरमुच्यते !! कपोलस्त्रोत्र श्लो.२४-स्कन्द पुराण

**हे सुर्यदेव ! तुम्ही तर सर्व जगच व्यापले आहे. तिन्ही लोकांनी ध्यान करण्या योग्य तुम्ही आहात म्हणूनच सुर्यास्तानंतर पाणी सुध्दा रक्तासमान गणले जाते.**

**अर्थात रात्रीभोजनाच्या त्यागाबरोबर सर्व लोकांना पापांपासुन वाचण्यासाठी सुर्यास्तानंतर पाणी पिण्याचा पण त्याग आवश्यक आहे.**

नक्तं न भोजयेद्यस्तु, चातुर्मास्ये विशेषत: ।
सर्वकामानवाप्नोति, इहलोके परत्र च ।। योगवाशिष्ठ पूर्वार्ध श्लो.१०८

**जे लोक रात्रीजेवण करत नाही आणि चातुर्मासामध्ये खास रात्रीजेवणाचा त्याग करतात त्यांना या भव आणि पराभवांमध्ये सर्व मनोरथे प्राप्त होतात.**

एकभक्तशनान्नित्यमग्निहोत्रफलं लभेत् !
अनस्तभोजनो नित्यं, तीर्थयात्रफलं भवेत् !! स्कंन्दपुराण स्कन्द ७ अ.११श्लो.२३५.

**जे लोक दररोज एकवेळच जेवण करतात त्यांना अग्निहोत्राचे फळ मिळते आणि जे लोक सुर्यास्तापुर्वी जेवण करतात त्यांना तीर्थयात्रेचे फळ मिळते.**

चातुर्मास्ये तु सम्प्राप्ते, रात्रीभोज्यं करोति य: ।
तस्य शुध्दिनं विद्येत, चान्द्रायणशतैरपि ।।        ऋषीश्वरभारत-वैदिकदर्शन.

**जे लोक चातुर्मासामध्ये पण रात्रभोजन करतात त्यांच्या पापांची शुध्दि शेकडो चंद्रायाण तपानी पण होत नाही.**

**अर्थात सर्व शास्त्रांमध्ये मदिरा, मांस, रात्रभोजन आणि कंदमुळे त्यागाचाच उपदेश दिला आहे आणि त्याचे फळ सर्व मनोकामना सिध्दि आणि घरबसल्या तिर्थयात्रा वगैरे सांगीतले आहे.**

**मदिरा, मांस, भक्षणामध्ये अनेक जीवांची हिंसा होते. आणि त्या हिंसेचे फळ वर सांगीतल्याप्रमाणे नरकातील दु:ख आहे. म्हणुन त्याग करायला पाहिजे. आणि आता अहिंसेचे फळ काय आहे ते सांगतो.**

यो दद्यात् काञ्चनं मेरुं, कृत्स्नां चैव वसुंधराम् ।
एकस्य जीवितं दद्यात्, न च तुल्यं युधिष्ठिर ! ।।     महाभारत

**हे युधिष्ठिर ! एक मानव सोन्याचा मेरु पर्वत किंवा संपूर्ण पृथ्वीच दान करतो, आणि दुसरा मानव एका प्राण्याला जिवनदान (अभय) देतो. परंतू या दोघांची बरोबरी कधीच होत नाही (कारण जिवनदान हेच श्रेष्ठदान आहे).**

न भू प्रदान न सुवर्ण दान न गो प्रदानं न तथान्न दानं ।
यथा वदान्तीह महा प्रदानं सर्वेषु दानेषु अभय प्रदानम् ।।

सोने, पृथ्वी, गाय आणि अन्नदानापेक्षा अभयदान श्रेष्ठदान / महादान आहे असे म्हटले आहे.

दीर्घमायु: परं रुपमारोग्यं श्लाघनीयता ।
अहिंसाया: फलं सर्वं, किमन्यत् कामदैव सा ।। योगशास्त्र प्र.२.

दिर्घ आयुष्य, श्रेष्ठरुप, आरोग्य आणि प्रशंसनीयता वगैरे अहिंसेचे फळ आहे. अधिक काय सांगु ? अहिंसा हि कामधेनू समान आहे.

अर्थात मदिरा, मांस भक्षण, रात्रीभोजन आणि कंदमुळे भक्षण च्या त्यागाने जे अहिंसचे पालन होते. त्याला जगातील सर्वश्रेष्ठ दान म्हटले जाते. त्याचे फळ कामधेनु समान अर्थात सर्व मनोकामना सिध्दिरुप म्हटले जाते.

मज्झिमनिकाय च्या कीटागिरीसूत्रा मध्ये सांगितले आहे कि - एकेवेळी मोठया भिक्षुक संघा बरोबर बौध्द भगवान काशिमध्ये चारिका करत होते. त्यावेळी भगवंताने भिक्षुकांना आमंत्रण केले, आणि म्हणाले “भिक्षुक हो ! मि रात्रभोजन व्यतिरिक्त भोजन करतो. रात्रिभोजन सोडल्यामुळे आरोग्य, उत्साह, ताकद, सुखपुर्वक विहारचा अनुभव मीळतो. या भिक्षुक हो ! तुम्ही ही रात्रीभोजन व्यतिरिक्त भोजन करा, रात्रिभोजन सोडल्यामुळे तुम्हीपण त्याचा अनुभव कराल.

अर्थात भगवान बुध्दांनीपण रात्रीभोजन त्यागा चा उपदेश दिला आहे.

# संकलनकार - CA. जयेश मोहनलाल शेठ.

संकलनकारांचे पुस्तके WWW.JAYESHSHETH.COM वर उपलब्ध आहे.